शासन अधिसूचना दि.14 ऑगस्ट, 2012 अन्वये दिवाणी न्यायालयाचे अधिकार प्रदान करण्यात आले. ते खालील प्रमाणे आहेत.

"10क. आयोगास कलम 10 च्या पोट कलम (1) खालील त्याचे कोणतेही कार्य पार पाडताना, दिवाणी प्रक्रिया संहिता, 1908 अन्वये दाव्याची न्याय चौकशी करण्यात्या दिवाणी 1908 न्यायालयाचे सर्व अधिकार असतील आणि ते विशेषतः पुढील बाबींसंबधीत असतील :-

(क) राज्याच्या कोणत्याही भागातील कोणत्याही व्यक्तीला समन्स पाठवणे व तिला हजर राहण्यास भाग पाडणे आणि तिची शपथेवर तपासणी करणे;

(ख) कोणत्याही दस्तऐवजाचा शोध घेण्यास व तो सादर करण्यास फर्मावणे;

(ग) शपथपत्रांवर पुरावा स्वीकारणे;

(घ) कोणत्याही कार्यालयाकडून कोणताही सार्वजनिक अभिलेख किंवा दस्तऐवज किंवा अशा अभिलेखाची किंवा दस्तऐवजाची प्रत मागविणे; आणि

(ड) साक्षीदारांची आणि दस्तऐवजांची तपासणी करण्यासाठी आयोगपत्र काढणे."

Scanned by CamScanner